# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०१७ / फाल्गुन २३, १९३८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(३)** | **कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २८**

---

### भाईंदर-पूर्व (जि.ठाणे) येथे चार वर्षीय बालिकेची करण्यात आलेली हत्या

**(१) * ८०५७७ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर-पूर्व (जि.ठाणे) येथील आझाद नगर येथे चार वर्षीय बालिकेवर अमानुष अत्याचार करुन तिची हत्या करण्यात आल्याची घटना दिनांक १४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार दोषींवर कोणती कडक कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) आझादनगर, भाईंदर (पूर्व) हा परिसर ठाणे ग्रामीण जिल्हयातील नवघर पोलीस ठाणे अंतर्गत येतो. दि.९.१.२०१७ रोजी २०.०० वा.सुमारास घडलेल्या सदर प्रकरणाची फिर्यादीने दि.१०.१.२०१७ रोजी फिर्याद दिल्याने नवघर पोलीस ठाणे I ०७/२०१७ भादंवि कलम ३६३, ३६४, ३७६-ड (२)(आय), ३०२, २०१, ३४ सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील ३ आरोपींना अटक केली आहे. उर्वरित एक आरोपीचा शोध सुरु आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उमरेड (जि.नागपूर) तालुक्यामधील टॉपवर्थ ऊर्जा ॲण्ड मेटल्स लिमिटेड कंपनीमधील कर्मचा-यांना पूर्वसूचना न देता कामावरून काढून टाकल्याबाबत**

**(२) * ७८६५२ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरेड (जि.नागपूर) तालुक्यामधील टॉपवर्थ ऊर्जा ॲण्ड मेटल्स लिमिटेड या कंपनीत नियमित ४५० तर कंत्राटी पध्दतीवर ६०० कर्मचारी काम करीत असून ३५० स्थायी कर्मचा-यांना कोणतीही पुर्वसुचना न देता कामावरून काढून टाकल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कर्मचा-यांना पुर्वसुचना न देता कामावरून काढून टाकणा-या कंपनीच्या व्यवस्थापक व सहव्यवस्थापकावर कोणती कारवाई करण्यात आली आहे तसेच सदर कर्मचा-यांना पुन्हा कामावर घेण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) टॉपवर्थ ऊर्जा अन्ड मेटल्स लिमिटेड, उकरवाही, ता.उमरेड, जि. नागपूर अंतर्गत कार्यरत असलेल्या टॉपवर्थ ऊर्जा अन्ड मेटल्स कंत्राटी मजदूर संघ या नोंदणीकृत संघटनेने, सदरहू आस्थापनेने त्यांचा स्पाज आयरन विभाग बंद करुन कामगारांना दि.३/८/२०१६ पासून कामावर घेणे बंद केले असल्याचे दि.७/९/२०१६ रोजी दिलेल्या निवेदनान्वये निदर्शनास आणुन दिले आहे, हे खरे आहे.

(२) टॉपवर्थ ऊर्जा अन्ड मेटल्स कंत्राटी मजदूर संघाच्या दि.७/९/२०१६ रोजीच्या निवेदनानुषंगाने चौकशी केली असता सदरहू आस्थापनेत सध्या २५० कर्मचारी व कामगार कार्यरत असून अपर कामगार आयुक्त, नागपूर यांचे कार्यालयाकडून उभयपक्षांना दि.५/१०/२०१६ ते दि.१७/२/२०१७ या कालावधीत विविध तारखांना चर्चेकरिता आमंत्रित करुन मध्यस्थी करण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत.

दरम्यान दि.१७/२/२०१७ रोजी अपर कामगार आयुक्त, नागपूर यांचेकडे झालेल्या बैठकीत माहे मार्च,२०१७ मध्ये कारखाना पूर्ववत सुरु झाल्यानंतर उर्वरित कामगार/कंत्राटी कामगार यांना प्राधान्याने व जेष्ठतेनुसार कामावर घेण्याचे व्यवस्थापनाने पत्राद्वारे आश्वासन दिले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाड औद्योगिक वसाहतीमधील डीजी इन्फ्रास्ट्रक्चर कारखान्याच्या व्यवस्थापनाने पुर्वसूचना न देता कारखाना बंद केल्याबाबत

**(३) * ७६६९१ श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड औद्योगिक वसाहतीमधील डीजी इन्फास्ट्रक्चर कारखान्यांच्या व्यवस्थापनाने कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता कारखाना बंद केल्याने ८२ कामगारांवर उपासमारीची वेळ आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(३) तदनुसार कामगारांना न्याय देण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) मे. डीजी इन्फास्ट्रक्चर कारखान्याच्या व्यवस्थापनाने दिनांक-१९/०१/२०१७ रोजीच्या नोटीसीद्वारे आस्थापनेत टाळेबंदी जारी केली असुन त्यामुळे ८१ कामगार परिणामित झाले आहेत, हे खरे आहे.

(२) होय, चौकशीअंती सदरहू कारखान्यातील उत्पादित मालाच्या मागणीस खीळ बसल्याने तात्पुरत्या स्वरुपात ७५% कामगार संख्या कमी करण्यासंदर्भात व्यवस्थापनाने कारखान्यात कार्यरत असलेल्या दोन संघटनांना दिनांक-३१/१२/२०१६ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या प्रस्तावास संघटनांनी प्रतिसाद न दिल्याने व सततच्या कामगार असंतोषामुळे विपरित घटना घडू नये, याकरिता व्यवस्थापनाने दिनांक-१९/०१/२०१७ रोजीच्या नोटीसीद्वारे अनिश्चित कालावधीकरिता टाळेबंदी जारी केली असल्याचे आढळून आले आहे.

(३) कामगार उपायुक्त, रायगड यांचेमार्फत व्यवस्थापकीय संचालक सेवा योजनांतर्गत उभयपक्षांमध्ये तडजोड घडवून आणण्याकामी दि.३१/१/२०१७, दि.१७/२/२०१७ व दि.२८/२/२०१७ रोजी बैठका घेण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर येथील हैद्राबाद रोडवरील विडी कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या घरकुल योजनेबाबत**

**(४) * ७५२५१ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील हैद्राबाद रोडवरील विडी कामगारांसाठी सन १९८७-८८ साली बांधण्यात आलेल्या घरकुल योजनेत लाभ न मिळालेल्या २२० कामगारांनी प्रत्येकी २,५०० रु. म्हाडा संस्थेकडे भरुनदेखील गत ३० वर्षापासून त्यांना अद्याप भूखंड देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत विडी कामगार व त्यांच्या संघटनेने मा.गृहनिर्माण मंत्री, मा.सहकार मंत्री, मा.गृहनिर्माण राज्यमंत्री व मा.पालकमंत्री सोलापूर यांच्याकडे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास भूखंड मिळण्याबाबत निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विडी कामगारांना घर बांधणीकरीता भूखंड देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१), (२), (३) व (४) जुळे सोलापूर भाग-२ येथे म्हाडा अंतर्गत विडी कामगारांकरीता घरकुल योजनेतील दुसरी जाहिरात दिनांक ७ जानेवारी, १९८८ रोजी दैनिक केसरी मध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीस अनुसरुन एकूण ११२४ अर्ज प्राप्त झालेले होते. त्यापैकी ७९५ अर्जदारांना घरकुल / भूखंड वाटप करण्यात आले. तसेच १०८ अर्जदारांनी अनामत रक्कमेचा परतावा घेतलेला असून अद्याप २२१ अर्जदारांनी परतावा घेतला नाही.

सोलापूर येथील विडी कामगारांना भूखंड (प्लॉट) देणेबाबत दिनांक १५ जानेवारी, २००४ रोजी शासन स्तरावर असा निर्णय घेण्यात आला की, "विडी कामगारांना सवलत म्हणून जे ३ महिन्यात अनामत रक्कम वजा जाता उर्वरित रु.२,५००/- भरतील त्यांना भूखंड (प्लॉट) देण्यात येईल" या प्रकरणात अनामत रक्कम न घेतलेल्या २२१ अर्जदारांनी तीन महिन्यांत अर्थात फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल २००४ पर्यंत तसेच तद्नंतर वाढवुन दिलेल्या मुदतीत (दिनांक ८ ऑक्टोबर, २००४ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २००४) अनामत रक्कम वजा जाता उर्वरित रु.२५००/- भरले नाहीत, त्यामुळे त्यांना भूखंड देण्यात आलेला नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील व्यावसायिकांकडून थकीत जकात व दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत

**(५) * ७४१९२ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील वाईन शॉप मालक व ज्वेलर्स इत्यादी व्यावसायिकांकडून सन २०१० ते २०१३ या कालावधीतील जकात कर व अन्य कर तसेच दंडापोटीची ६०० कोटी रूपयांची थकबाकी वसूल करण्यात यावी तसेच या वसुलीस हेतुत: विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर दिवाणी व फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांचेवर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन मा.मुख्यमंत्री, प्रधान सचिव, नगर विकास विभाग तसेच श्री.सुनिल चव्हाण, प्रभारी आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री तसेच प्रधान सचिव, नगरविकास व प्रभारी आयुक्त, श्री.सुनिल चव्हाण यांना दिलेल्या निवेदनातील प्रमुख मागण्या कोणत्या आहेत,

(३) असल्यास, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी मा.मुख्यमंत्री व प्रधान सचिव, नगरविकास तसेच ठाणे महानगरपालिका प्रशासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील वाईन शॉप मालक व ज्वेलर्सकडून सन २०१० ते २०१३ या काळातील जकात कर व दंडापोटी वसुल करावयाच्या थकबाकी संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने मा.श्री.संजय केळकर, विधानसभा सदस्य यांचे दिनांक २३.१२.२०१६ चे पत्र विभागास दिनांक ०२.०१.२०१७ रोजी प्राप्त झाले.

(२) या निवदेनात मा.उच्च न्यायालयाच्या पुढील सुनावणीपूर्वी वाईन शॉप मर्चंट व ज्वेलर्स यांचेकडून जकात कर दंडापोटी थकबाकी असलेली रुपये ६०० कोटी रक्कम वसुल करावी तसेच दंड वसुल करण्यात कुचराई करणाऱ्या महानगरपालिकेच्या सर्व संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द दिवाणी व फौजदारी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

(३) निवेदनातील मागणीनुसार आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत :-

- याप्रकरणी चौकशी करुन दोषी असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द आवश्यकतेनुसार प्रशासकीय व फौजदारी कारवाई चार आठवड्यात करावी.
- या प्रकरणी ज्वेलर्स व मद्यविक्रेते यांनी चुकविलेला जकात, त्यावरील दंड व सर्व अनुषांगिकबाबी तसेच इतर सर्व थकबाकी व्याजावरील रक्कमेच्या वसुलीबाबत व्यक्तीश: लक्ष घालुन तीन महिन्याच्या कालावधीत नियमानुसार वसुली करावी.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद येथे स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छता पहाणीसाठी आलेल्या केंद्रीय पथकाने महापालिकेकडून लाच स्वीकारल्याबाबत

**(६) * ७९४५४ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत औरंगाबाद येथे स्वच्छतेच्या पहाणीसाठी आलेल्या केंद्रीय पथकाला महापालिकेकडून १ लाख ७० हजार रुपयांची लाच स्वीकारताना पकडण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद येथे येण्यापूर्वी सदर पथक राज्यातील आणखी पाच शहरात स्वच्छेतेच्या पाहणीसाठी गेले असून तेथेही महापालिकांच्या अधिका-यांकडून पैसे घेतले असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पथकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत करण्यात येणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षणा दरम्यान औरंगाबाद येथे स्वच्छतेची पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्रीय पथकाला १ लाख ७० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले, ही वस्तुस्थिती आहे.

(२) औरंगाबाद येथे येण्यापूर्वी अशा प्रकारे पाहणी केलेल्या शहरांकडून सदर पथकातील सदस्यांनी लाच मागितल्याची तक्रार/माहिती शासनास प्राप्त झालेली नाही.

(३) सदर पथकाची नेमणूक केंद्र शासनामार्फत करण्यात आली असून यामध्ये त्रयस्थ संस्थेच्या सदस्यांचा समावेश करण्यात आलेला होता. सदर प्रकरणाची वस्तुस्थिती केंद्र शासनास कळविण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत सदर पथकातील सदस्यांविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई सुरु आहे. तसेच ज्या शहरांमध्ये या पथकाने तपासणी केली होती, तेथे केंद्र शासनाच्या इतर त्रयस्थ संस्थेमार्फत पुन्हा तपासणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**टेम्पल रोज रिअल इस्टेट प्रा.लि. कंपनीने मुंबई व पुणे येथील गुंतवणूकदारांची केलेली फसवणूक**

**(७) * ७८०४९ ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व पुणे येथील ३ हजार गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या टेम्पल रोज रिअल इस्टेट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या ५ संचालकांविरोधात आर्थिक गुन्हे शाखेने गुन्ह्यांची नोंद करुन तपास सुरु केला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीच्या संचालकांनी जवळपास १२००० गुंतवणूकदारांच्या ४०० कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार करुन गुंतवणूकदारांच्या ठेवीमधून पुणे, सोलापूर, रायगड आणि शहापूरमध्ये ६२ कोटींचे भूखंड खरेदी केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती कंपनीच्या संचालकांना अटक करुन सर्व गुंतवणूकदारांचे पैसे परत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

सदर प्रकरणी रोज रिअल इस्टेट प्रायव्हेट कंपनीच्या ५ संचालकाविरोधात आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ०८/१७ कलम ४०९, ४२०, १२० (ब) भा.द.वि. सह कलम ३ व ४ एमपीआयडी ॲक्ट १९९९ व कलम ४, ५ व ६ पीसीएमसीबी ॲक्ट १९७८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

नमूद दाखल गुन्हयाच्या तपासादरम्यान आरोपी कंपनीने जवळपास ३००० गुंतवणूकदारांच्या ९० कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले आहे. गुंतवणूकदारांच्या ठेवींमधून आरोपीत कंपनी व आरोपीत कंपनीच्या संचालकांच्या नावे पुणे, सोलापूर, रायगड, शहापूर या ठिकाणी भुखंड खरेदी करण्यात आले आहेत.

(३) सदरहू प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखा गु.र.क्र. ०८/२०१७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून कंपनीच्या संचालकांची स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरचे प्रकरण तपासाधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण रेल्वे स्थानक परिसरातील स्कायवॉकवर केल्या जाणाऱ्या जाहिरातीचा शुल्कात झालेला गैरव्यवहार**

**(८) * ७८६१२ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण रेल्वे स्थानक परिसरात उभारण्यात आलेल्या स्कायवॉकवर मोठ्या फलकाव्दारे जाहिराती प्रसिद्ध केल्या जात असून त्याच्या मोबदल्यात महानगरपालिकेला कोणतेही जाहिरात शुल्क अदा करण्यात येत नसून यामध्ये १० कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कमेचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार सदर गैरव्यवहाराप्रकरणी दोषी असणा-यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कल्याण रेल्वे स्थानक परिसरात वाहतुक सुधारणेसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अर्थसहाय्यातून सॅटीस/ स्कायवॉक प्रकल्प हाती घेण्यात आला होता.

या स्कायवॉकचा वापर सुरु झाल्यानंतर त्यावरील जाहिरातीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून मे.आयकॉन ॲडव्हर्टायझिंग या अभिकरणास दि.१४/१२/२०१० पासून प्रथमतः २ वर्षाच्या कालावधीकरीता ठेका देण्यात आला होता. या ठेक्याची वाढीव मुदत दि.१३/१२/२०१३ रोजी संपुष्टात आली.

सदर स्कायवॉक दि. ०५/०८/२०१४ रोजी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. सदर स्कायवॉकवरील जाहिरातीकरीता निविदा प्रक्रिया सुरु असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

सदर ठेक्याची मुदत संपल्यानंतरही सदर अभिकरणाकडून जाहिरात शुल्क अदा न करता स्कायवॉकवर जाहिरात करण्यात येत होती, ही वस्तुस्थिती आहे.

(२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ज्या वार्षिक दराने संबंधित अभिकरणास जाहिरातीचा ठेका दिला होता, त्या रकमेवर १० टक्के वार्षिक वाढ आकारुन दि.१४/१२/२०१३ ते दि.२८/०२/२०१७ या कालावधीकरीता जाहिरात शुल्कापोटी रु.१,०१,२१,५४३/- एवढ्या रकमेच्या वसूलीकरीता महानगरपालिकेकडून संबंधितांस मागणीपत्र बजावण्यात आले आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून या प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांची चौकशी प्रस्तावित करण्यात आली असून संबंधितांस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

या प्रकरणाच्या चौकशीअंती दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल ४ आठवड्यांच्या आत शासनास सादर करण्याबाबत आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना निर्देश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दुरदर्शनच्या किसान वाहिनीमध्ये "किसान पत्रकार" म्हणून नोकरी देण्याचे आमिष दाखवून गैरव्यवहार करण्यात आल्याबाबत

**(९) * ७६८९३ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या अख्यत्यारित असलेल्या दुरदर्शनच्या किसान वाहिनीमध्ये "किसान पत्रकार" म्हणून नोकरी देण्याचे आमिष दाखवून किसान वाहिनीच्या बँक खात्यात उमेदवारांनी रुपये १३६८०/- इतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून भरल्यानंतर १५ दिवसांचे प्रशिक्षण देऊन पत्रकारितेची पदविका देण्याचे आश्वासन देवून गैरव्यवहार करणारा समुह कार्यरत असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलिसांनी संबंधित दोषींविरुध्द गुन्हा नोंदविला आहे काय व त्यानुसार अद्याप किती जणांना अटक करण्यात आली असून त्याचा तपशिल काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि सदर प्रकरणी डी डी किसान वाहिनीमध्ये नोकरी देण्याचे आमिष दाखवून रुपये ३८,०५०/- ची फसवणूक केली अशा पुणे येथील एका फिर्यादीचे तक्रारीवरुन दोन आरोपींविरुद्ध सिंहगड पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ४१६/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच सदर गुन्ह्याबाबतचा तपास केला असता गुन्हा उघडकीस न आल्यामुळे सदर गुन्हा कायम तपासावर ठेवून गुन्ह्याचा ‘अ’ फायनल मा.न्यायालयास सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एटापल्ली (जि.गडचिरोली) येथील सुरजागड परिसरात नक्षलवाद्यांनी वाहनांची केलेली जाळपोळ

**(१०) * ७४६९४ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एटापल्ली (जि.गडचिरोली) येथील सुरजागड परिसरात नक्षलवाद्यांनी ७६ ट्रक, ३ पोकलँड व एक दुचाकी जाळल्याची घटना घडल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अग्निकांडात जवळपास १ हजार नक्षलवादी सहभागी झाले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अशाप्रकारे वारंवार होत असलेल्या घटनांवर प्रतिबंध घालण्याकरिता कोणत्या उपाययोजना वा कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) दिनांक २३.१२.२०१६ रोजी मौजे डेहरे ते सुरजागड रोड लोह प्रकल्प परिसरात प्रतिबंधीत माओवादी संघटनेचे ५० ते ६० बंदुकधारी नक्षलवादी तसेच त्यांच्या साध्या गणवेषातील ६० ते ७० नक्षल समर्थकांनी संगनमताने कट रचून लोह खनिज प्रकल्पातील ट्रक चालक व मजूर यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच ट्रकांचे डिझेल टँक फोडून ७७ ट्रक, ३ पोकलँड मशीन व एक मोटारसायकलला आग लावली. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन एटापल्ली येथे गु.र.क्र. ३५/२०१६ कलम ३०७, ३४१, ३४२, ४३५,३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४८, १४९, १२० (ब) भा.दं.वि., ५/२८ भाहका, १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १६, १८, २०, २३ यु.ए.पी.ए. ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

शासनाने पुढीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत :-

- शासनाने नक्षलवाद्यांचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक ती शस्त्रे व दारुगोळा याबरोबर आधुनिक संपर्क व्यवस्था, वाहन व्यवस्था, भुसूरुंग प्रतिबंधक वाहने व हेलिकॉप्टर उपलब्ध करुन दिले आहेत.
- जिल्ह्यातील नक्षलवाद्यांच्या कारवायांवर अंकुश लावण्यासाठी जिल्हा पोलीस तसेच केंद्रीय राखीव पोलीस बल यांच्या माध्यमातून नक्षलविरोधी अभियान राबविण्यात येते.
- जिल्ह्यात नक्षलविरोधी कृतीकरिता केंद्रीय राखीव पोलीस बलाच्या बटालियन, कोब्रा बटालियन, राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्या व जिल्हा पोलीस दल तसेच सी-६० च्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. जवानांना युद्धप्रशिक्षण देण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. नक्षलविरोधी शोध अभियान, गस्त, नाईट ॲम्बुश, नाकाबंदी यामुळे नक्षलवाद्यांच्या हालचालींवर प्रतिबंध आणण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या थ्री झोन व्हॉल्व्ह योजनेच्या भाग-२ चे काम अपुर्ण असल्याबाबत

**(११) * ८१५७९ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा शहरास पाणी पुरवठा करणा-या थ्री झोन व्हॉल्व्ह योजनेच्या भाग-२ चे काम अपुर्ण असल्याने शहरात सुरळीत पाणी पुरवठा होत नसल्याचा अहवाल माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पाणी पुरवठा योजनेच्या भाग २ साठी आवश्यक असलेल्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम निधी अभावी होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, बुलढाणा शहर पाणी पुरवठा योजनेच्या भाग-२ चे अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी व पाण्याच्या टाकीचे बांधकाम करणेसाठी निधी मंजूर करणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) (२) (३) (४)

- बुलढाणा शहराच्या थ्री झोन व्हॉल्व्ह व्यवस्थेतील भाग -२ मध्ये पाणी साठवण क्षमतेत वाढ करण्यासाठी १३ लक्ष लिटर्स क्षमतेची टाकी उभारण्याच्या नगरपरिषदेच्या रू.२०४.२० लक्ष खर्चाच्या प्रस्तावास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तांत्रिक मंजुरी फेब्रुवारी २०१७ मध्ये दिली असुन जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेकडुन प्रशासकीय मंजुरीची कार्यवाही करण्यात येत आहे.
- पाण्याचे पुरेसे स्त्रोत, पाणी साठवण क्षमता याबरोबरच अस्तित्वातील पाणी वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी हायड्रोलिक मॉडेलिंग, कन्झुमर सर्वे, वॉटर ऑडीट या यारख्या बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. याची पूर्तता करण्यासाठी रू.९५.०३ लक्षचा प्रस्ताव नगरपरिषदेने तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सादर केला आहे.

- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानाअंतर्गत मंजूर प्रकल्पात खडकपूर्णा धरणातून पाणी अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत आणणे, नविन विकसीत भागामध्ये जलवाहिनी टाकणे व पाणी साठवण क्षमता वाढविणे या बाबी अंतर्भूत आहेत.
- या प्रकल्पाची किंमत रू.८२.७७ कोटी असून यात शासनाचा रू.३३ कोटी हिस्सा वितरित करण्यात आला आहे. नगरपरिषदेच्या रू.१२.८१ कोटी हिस्स्यांपैकी सद्यस्थितीत रू.६.९७ कोटींचा भरणा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रिजनल पार्क झोनची (आरपीझेड) ३,२०० एकर जमीन शेतकऱ्यांना परत करण्याबाबत**

**(१२) * ७३९०८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहराच्या निर्मितीसाठी ठाणे, पनवेल व उरण तालुक्यातील ९५ गावातील शेतक-यांच्या शेतजमीनी संपादन करण्यात येवूनही शासनाने अद्याप रिजनल पार्क झोनच्या (आरपीझेड) ३,२०० एकर जमीनीचा १० वर्षात विकास न केल्याने उक्त जमीन परत करण्याची मागणी स्थानिक शेतक-यांनी शासनाकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन मुळ शेतक-यांना ४६ वर्ष इतका कालावधी होवूनही अद्याप शासनाने परत न करण्याची व त्यास लागत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) त्यानुषंगाने उक्त जमीनी मुळ शेतक-यांना विनाविलंब परत करण्याच्या दृष्टीने शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२), (३) व (४) विकास करताना प्रथम विकसनशिल क्षेत्रात येणा-या जमिनींचे भूसंपादन करण्याचा प्रस्ताव करण्यात आला व त्याप्रमाणे त्या जमिनींचे भूसंपादन करुन विविध नगरांचा (नोडस्) विकास करण्यात आला. प्रादेशिक उपवन क्षेत्र विकसनशिल नसल्याने कोणत्याच नगरांचा (नोडस्) भाग नव्हता. त्यामुळे प्रादेशिक उपवन क्षेत्रात येणा-या जमिनींचे भूसंपादन तत्परतेने करण्यात आले नाही. आता आजूबाजूच्या विकसनशिल क्षेत्रात येणाऱ्या परिसराचा विकास झाल्याने रिजनल पार्क झोन क्षेत्रातील जमिनीवर विकासाचा दबाव वाढला आहे. विकसनशिल क्षेत्राचे भूसंपादन पूर्ण होत असल्याने त्या नंतर विकसनशिल नसणाऱ्या रिजनल पार्क झोनमधील जमिनीचे भूसंपादन करण्याचे विचाराधीन आहे. सिडकोने संपादित न केलेल्या जमिनींचे भूसंपादन व विकासासंबंधी तंत्र निश्चित करण्यासाठीचा प्रस्ताव शासनास दिनांक १९/१२/२०१६ च्या पत्रान्वये सादर केला आहे. त्यावर संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

-----------------

**मुंबईतील शिवडी येथील टी बी रुग्णालयात डिजीटल एक्स रे मशीनकरिता देण्यात आलेली रक्कम बँकेत विना वापर जमा असल्याबाबत**

**(१३) * ७७२७८ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिवडी येथील टी. बी. रुग्णालयात डिजीटल एक्स रे मशीन खरेदीसाठी सीएसआरमार्फत देण्यात आलेली रक्कम गत दहा महिन्यांपासून बँकेत विना वापर जमा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील टी. बी. रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता सद्या एक्स रे पारंपारिक फिल्मवर काढले जात असल्यामुळे रुग्णांवर उपचार सुरु करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भातील नस्ती परळच्या एफ दक्षिण वॉर्ड मधील इंजिनियरिंग विभागाच्या कार्यालयात मंजूरीसाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुसार रुग्णालयात अद्यावत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) शिवडी येथील टी.बी. रुग्णालयात सी.एस.आर. (CSR) अंतर्गत डिजिटल एक्स-रे मशीनची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी माझगांव डॉक व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार, माझगांव डॉक यांनी एकूण १ कोटी रुपये इतका निधी मंजूर केला आहे.

त्यापैकी रु. १७.६४ लाख इतकी रक्कम त्यांनी दिनांक ३०.०७.२०१६ रोजी महानगरपालिकेच्या कोषागरात जमा केली आहे.

(२) सदर रुग्णालयात पारंपारिक फिल्मवर एक्स-रे काढले जात असल्यामुळे रुग्णांवर उपचार सुरु करण्यासाठी विलंब होत आहे हे खरे नाही.

(३), (४) व (५) सदर रुग्णालयातील एक्स-रे मशिनसाठी आवश्यक असलेली स्थापत्य कामे करण्याचा प्रस्ताव दिनांक १९.०८.२०१६ रोजी एफ/दक्षिण विभागाच्या अभियंता कार्यालयाकडे पाठविण्यात आला होता.

तद्नंतर, दिनांक १६.११.२०१६ रोजी या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, माझगांव डॉककडून प्राप्त झालेला रु. १७.६४ लाख इतका निधी महानगरपालिकेच्या एफ/दक्षिण विभागाकडे या कामासाठी हस्तांतरीत करण्यात आला आहे.

स्थापत्य कामे १२ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण केल्यानंतर डिजिटल एक्स-रे मशीन बसविण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

-----------------

## नाशिक महानगरपालिकेने पूर प्रभाव क्षेत्र कमी करण्याकरिता उपाययोजना न केल्याबाबत

**(१४) * ७७४९२ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी नदीला सन २००८ मध्ये महापूर आल्यानंतर नाशिक महानगरपालिकेने पुर प्रभाव क्षेत्र कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना सुचविण्यासंदर्भात पुणे येथील केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र यांना परीक्षण करण्याकरिता रुपये ७.५० लाख शुल्क अदा केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नंतर दिनांक १३ डिसेंबर, २०१२ रोजी केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र, पुणे यांचा अहवाल जलसंपदा विभागाने तात्काळ नाशिक महानगरपालिकेस सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालावर नाशिक महानगरपालिकेने अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

नाशिक महानगरपालिकेने केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र, पुणे यांना सदर कामांकरीता आवश्यक शुल्क रु.७.४५ लक्ष अदा केलेले आहे.

(२) केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र, पुणे यांनी जलसंपदा विभागास सादर केलेला तांत्रिक अहवाल नाशिक महानगरपालिकेस नोव्हेंबर, २०१२ मध्ये प्राप्त झाला आहे.

(३) सदर अहवालानुसार करण्यात आलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीची पुर्व व्यवहार्यता (प्रि-फिजीबिलीटी) तपासण्यासाठी नोव्हेंबर २०१६ मध्ये जलसंपदा विभाग व नाशिक महानगरपालिका यांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात आली आहे.

या समितीमार्फत पुर्व व्यवहार्यता अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) सदर अहवाल तीन महिन्यांमध्ये सादर करण्याबाबत व त्याअनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत नाशिक महानगरपालिकेस सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लोणार नगरपरिषदेतील (जि. बुलढाणा) एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत घरकुलांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(१५) * ८०३०१ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार (जि. बुलढाणा ) नगरपरिषदेतील एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत १३०६ घरकूल योजनेचे काम अद्‌याप पूर्ण झाले नसल्याचे तसेच सदर काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी व मा. मुख्यमंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१६ च्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे आहे.

लोणार (जि.बुलढाणा) नगरपरिषदेतील एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमातंर्गत काम पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाने दि.३१ मार्च,२०१७ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. सदर नगरपरिषदेने टप्पा क्र.२ प्रकल्पासाठी ६०६ घरकुलां ऐवजी ४०२ घरकुलांसाठी प्रकल्प सिमित केल्याने एकूण १३०६ घरकुलां ऐवजी ११०२ घरकुलांचा प्रकल्प आहे.

माहे डिसेंबर, २०१६ च्या सुमारास सदरचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुरंदर (जि.पुणे) येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरु करण्याबाबत**

**(१६) * ७४६६८ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन प्रवासी वाहतूकीची क्षमता अपुरी पडत असल्यामुळे पुणे जिल्हयात आंतरराष्ट्रीय विमानतळ होण्याकरिता गत दहा वर्षा पूर्वीपासून शासनामार्फत कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयातील पुरंदर येथे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी अठराशे हेक्टर जागा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१६ च्या सुमारास शासनामार्फत घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन सदर प्रकल्पाचे काम केव्हा सुरु करण्यात येणार आहे व त्यास किती कालावधी लागण्याचे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) पुणे विमानतळासाठी पुरंदर येथील जागेची निश्चिती व प्रकल्प सुसाध्यता अहवाल याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात १२ डायलिसिस केंद्रे सुरू करण्याबाबत

**(१७) * ७४१७५ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरात मुत्रपिंड निकामी झालेल्या रूग्णांना डायलिसीसचा उपचार त्वरीत मिळण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने विविध ठिकाणी डायलिसिसची १२ केंद्रे सुरू करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या केंद्राव्दारे १९९ डायलिसिस यंत्राच्या सहाय्याने ३५० रूपयांहून कमी शुल्कात रूग्णांना सेवा मिळणार असून निवड झालेल्या संस्थांवर डायलिसिस यंत्र बसविणे व त्याची देखभाल दुरूस्ती, मनुष्यबळ यांची व्यवस्था करणे बंधनकारक केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त डायलिसिस केंद्रे किती कालावधीत कार्यान्वित करण्यात येणार आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सार्वजनिक-खाजगी सहभाग (पी.पी.पी.) प्रोत्साहन तत्वावरील १२ डायलिसिस केंद्रे सुरु करण्यासाठी आवश्यक निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) सदर १२ डायलिसिस केंद्रे कायदेशीर प्रक्रिया करुन यथाशीघ्र कार्यान्वित करण्यात येणार आहेत.

-----------------

## वसई-विरार महानगरपालिकेमध्ये झाडांच्या संरक्षणार्थ लोखंडी जाळया (ट्री गार्ड) बसविण्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१८) * ७३८३८ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यांच्या दुतर्फा लावण्यात आलेल्या झाडांच्या संरक्षणार्थ लोखंडी जाळया (ट्री गार्ड) लावण्याच्या कामात सुमारे ७ कोटी रुपयाचा गैरव्यवहार झाल्याचे मा. लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ जानेवारी २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठेकेदारांनी लोखंडी जाळया (ट्री गार्ड) लावण्याच्या कामात ७७% लोखंडी ट्री गार्ड लावले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सर्व संबंधित अधिकारी व ठेकेदार यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. अशा स्वरुपाची तक्रार स्थानिक नगरसेवक यांनी दिनांक ०५.०१.२०१७ रोजी केली आहे.

(२) व (३) ई-निविदेमार्फत निवड झालेल्या ठेकेदारांनी एकूण ४९,६०० इतक्या लोखंडी जाळ्या (ट्री गार्ड) बसवले होते. त्यापैकी सद्य:स्थितीत १५,००० इतक्या लोखंडी जाळ्या (ट्री गार्ड) जागेवर आहेत.

उर्वरीत ३४,६०० लोखंडी जाळ्या दोन वर्षाच्या कालावधीत चोरीला गेल्याने पोलीस स्थानकात त्यानुसार वेळोवेळी तक्रार नोंदविण्यात आलेल्या आहेत असे आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

याबाबत आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना सखोल चौकशी करुन चार आठवड्यात अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागातून क्षेपणभूमीपर्यंत कचरा वाहून नेण्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१९) * ७४०७० श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील विविध विभागातील कचरा डंम्पिग ग्राऊंड पर्यंत वाहून नेण्यासाठी महानगरपालिकेने माहे मे, २०१२ ते एप्रिल २०१७ या कालावधीसाठी ९०० कोटी रूपयांच्या निविदा काढल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही कंत्राटदारांनी टेंडर प्रक्रियेत आणि कचरा वाहून नेण्याच्या कामात महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या संगनमताने गैरव्यवहार केल्याबाबत दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी स्थायी समितीच्या बैठकीत काही सदस्यांनी तक्रार करून चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कचरा वाहून नेण्यासाठी महापालिकेने वेगवेगळया कंत्राटदारांना वेगवेगळे भाडे दिल्याने महापालिकेत माहिती अधिकाराखाली मागविलेल्या माहितीवरून सदरहू ९०० कोटींचा गैरव्यवहार झाल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०१२ ते सन २०१७ या कालावधीसाठी मुंबई शहरातील विविध विभागांतील कचरा संकलन करुन क्षेपणभूमीपर्यंत वाहून नेण्यासाठी सन २०११-१२ मध्ये ई-निविदा पध्दतीने ८ गटांकरिता रु. ८९८.३३ कोटी इतक्या रकमेच्या निविदा मागविल्या होत्या.

(२) सदर प्रकरणी स्थायी समितीच्या बैठकीत काही सदस्यांनी अशा स्वरुपाची तक्रार करुन चौकशी करण्याची मागणी केली होती हे खरे आहे.

(३), (४) व (५) सन २०१६ मध्ये महानगरपालिकेच्या चाचणी लेखा परिक्षण व दक्षता विभागाने याबाबत दिनांक ०१.०१.२०१६ रोजी चौकशी केली असून, सदर प्रकरणी कोणतीही अनियमितता झाल्याचे आढळून आले नाही.

तथापि, सदर प्रकरणी वारंवार होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने दिनांक २६.१०.२०१६ रोजी चाचणी लेखा परिक्षण व दक्षता विभागास पुन्हा चौकशी करण्याचे आदेश महानगरपालिकेने दिले आहेत.

-----------------

## आणे (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील कल्याण-नगर महामार्गावरील तीन तलाठ्यांना अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रक चालकाने केलेली मारहाण

**(२०) * ७९३६३ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-नगर महामार्गावरील आणे (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रकची तपासणी करणाऱ्या महसूल विभागाच्या पथकातील तीन तलाठ्यांना ट्रक चालकाने दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी शिवीगाळ, दमदाटी करुन गंभीर मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेल्हे, साकुरी, मंगरुळ, पारनेर, अहमदनगर आदी भागातून वाळू लिलाव बंद असतांनाही महसूल व पोलीस अधिकाऱ्यांच्या संगनमताने वाळूची चोरटी वाहतूक सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. सदर प्रकरणी आळेफाटा पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. ०४/२०१७ भा. द. वि. कलम ३५३, ३२३, ४२७, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी ४ आरोपींना अटक करण्यात आली असून सध्या सर्व अटक आरोपी जामिनावर मुक्त आहेत. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(२) व (३) नाही, हे खरे नाही. अवैध चोरटी वाळू वाहतुक प्रतिबंध करण्यासाठी पोलीस विभाग व महसूल विभाग यांची स्वतंत्र तसेच संयुक्त कारवाई सुरु असुन वेळोवेळी अवैध चोरट्या वाळू वाहतूक व उपशावर कारवाई करण्यात आली आहे. महत्वाच्या मार्गावर नाकाबंदी करण्यात येत असून त्याद्वारे अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करण्यात येत आहे. सन २०१६ मध्ये लिलाव बंद काळात पोलीस व महसूल विभागाने अवैध वाळू वाहतुक व उपशाबाबत एकुण ३३ प्रकरणी कारवाई केली असून ८९ आरोपींना अटक केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिवडी न्हावा-शेवा सी-लिंक प्रकल्पाच्या कामाबाबत**

**(२१) * ७४०१५ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईला दक्षिण मुंबईशी जोडणा-या महत्वाकांक्षी शिवडी न्हावा-शेवा सी-लिंक प्रकल्पाच्या अंदाजित रुपये १७ हजार ३०० कोटी खर्चाच्या योजनेस शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात केव्हापासून सुरू करण्यात येणार आहे व हा प्रकल्प किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रश्नाधिन प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पाच्या रु.१७८४३ कोटी खर्चास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक ०३ जून, २०१६ रोजी मान्यता दिली आहे.

(२) सदर प्रकल्पामध्ये मुंबई शहरातील शिवडी व मुख्य भूमीवरील न्हावा यांना जोडणाऱ्या २२ कि.मी. लांबीच्या ६ पदरी (३+३) पुलाचा अंतर्भाव आहे. या पुलाची समुद्रातील लांबी १६.५ कि.मी. असून जमिनीवरील पुलाची (पोहोचमार्ग) लांबी ५.५ कि.मी. इतकी आहे. या पुलाला मुंबई शहरातील शिवडी व मुख्य भूमीवरील शिवाजी नगर, राज्यमार्ग-५४ व राष्ट्रीय महामार्ग-४ब वर चिर्ले गावाजवळ आंतरबदल (Interchange) आहेत.

(३) व (४) सदर प्रकल्पाकरीता पूर्वअर्हताप्राप्त निविदाकारांकडून निविदा मागविण्यात आल्या असून सदर निविदा एप्रिल २०१७ मध्ये प्राप्त होणे अपेक्षित आहे. प्राप्त निविदांची छाननी करून तद्नंतर प्रकल्पाचे काम सुरू करणे प्रस्तावित आहे. प्रकल्पाचा बांधकाम कालावधी सुमारे साडेचार वर्षे इतका आहे.

-----------------

## मौजे उंचखडक ब्रुदुक (ता.अकोला, जि.अहमनगर) येथे जादुटोणा करणाऱ्या इसमाने ५ वर्षीय मुलाची हत्या केल्याबाबत

**(२२) * ७८२०१ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उंचखडक ब्रुदुक (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील ५ वर्षीय मुलाला जादुटोण्यासाठी विहिरीत मारुन टाकण्यात आल्याची घटना दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी निदर्शनास येऊनही पोलिसांनी अद्याप कोणतीच कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर घटनेबाबत दि. १३/१०/२०१५ रोजी अकोले पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १५३/२०१५ भा.दं.वि. कलम ३०२,३६३,२०१ सह महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व आघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटन अध्यादेश कायदा २०१३ कलम ३ अन्वये गुन्हा दाखल करुन १ आरोपीस अटक करण्यात आली होती. आरोपी विरोधात मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अकोले यांचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

मा. उच्च न्यायालयाने सदर आरोपीस जामिन मंजूर केला आहे. गुन्हयाच्या सखोल तपासासाठी आरोपीची नार्को चाचणी करण्याची परवानगी मिळालेली आहे शिवाय इतर ५ संशयितांची नार्को चाचणी करण्याची परवानगी मागण्यात आली आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## नंदुरबार येथे पोलिसांसाठी १६८ सदनिका बांधणारे कंत्राटदार मे. साईनाथ एंटरप्राइजेसकडून आकारण्यात येणाऱ्या दंड वसुलीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२३) * ७७०३३ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार येथे पोलिसांसाठी १६८ सदनिका बांधणारे कंत्राटदार मे. साईनाथ एंटरप्राइजेसकडून दंड वसुलीत गैरव्यवहार झाल्याचे हिंदु विधीज्ञ परिषदेने माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान मा. मुख्यमंत्री, पोलीस महासंचालक आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेकडे तक्रार करून सदर गैरव्यवहाराची चौकशी करून संबंधितांवर गुन्हे नोंदवण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळ मर्यादितचे तत्कालीन महाव्यवस्थापक टी.सी. भाल आणि व्यवस्थापकीय संचालक संजीव दयाळ यांनी नंदुरबार येथील बांधकामातील कंत्राटदाराकडून ३ कोटी ७८ लाख रुपयांऐवजी ३ कोटी ६१ लाख ६४ हजार ८१५ रुपयांच्या वसुलीसाठी न्यायालयात दावा दाखल करून महामंडळाचे आर्थिक नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त प्रकरणी मे. साईनाथ एंटरप्राइजेसकडून अंदाजे पावणे आठ कोटी रुपयांहून अधिक रक्कम वसूल करण्याबाबत न्यायालयाकडून आदेश देण्यात येवूनही अद्याप वसूली करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कायदेशीर कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) या संदर्भात महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांचेकडे तक्रार प्राप्त झाली होती.

(२), (३), (४) व (५) नंदुरबार येथील १६८ निवासस्थानांचे बांधकाम करण्यासाठी निविदा प्रक्रीयेद्वारे कंत्राटदार, मे. साईनाथ इंटरप्राइजेस यांना सदरहू कामाचे कंत्राट सन २००४ मध्ये देण्यात आले होते. याअनुषंगाने महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ आणि कंत्राटदार यांच्यामध्ये करार करण्यात आला होता. कंत्राटदाराने विहीत मुदतीमध्ये काम पूर्ण न केल्याने व करारातील अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे फेरनिविदा प्रक्रीयेद्वारे सदरहू कामाचे कंत्राट अन्य कंत्राटदारास देण्यात आले.

कंत्राटदार, मे. साईनाथ इंटरप्राइजेस यांनी करारातील अटी व शर्तींचा भंग केल्यामुळे व फेरनिविदा प्रकीयेमुळे खर्चामध्ये झालेली वाढ वसूल करण्यासाठी पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडून दिवाणी न्यायालयात दावा दाखल करण्यात आला. दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) नंदुरबार यांनी स्पेशल सिव्हिल सूट क्र. २८/२०११ या प्रकरणात दिनांक ०५.०५.२०१२ रोजी दिलेल्या न्यायनिर्णय व आदेशानुसार संबंधित कंत्राटदाराकडून रु.३,६१,६४,८१५/- इतकी रक्कम व्याजासहीत विहित मार्गाने वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच रु.१७,०६,०००/- इतक्या अतिरिक्त रक्कमेच्या वसुलीसाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांचेकडून सक्षम न्यायालयात दावा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**मानखुर्द (मुंबई) येथील महाराष्ट्र नगरातील झोपडपट्टीला लागलेली आग**

**(२४) * ७६६९६ श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मानखुर्द येथील महाराष्ट्र नगरातील झोपडपट्टीला दिनांक १५ डिसेंबर २०१६, रोजी वा त्या सुमारास गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन लागलेल्या आगीत मोठी जिवीत व वित्त हानी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेत एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाला असून दोन लहान मुलांसह बारा जण गंभीररित्या जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अरुंद गल्ल्या आणि एकमजली घरांमुळे अग्निशमन दलाला आपले कार्य पार पाडतांना मोठी कसरत करावी लागली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मृतांच्या कुंटुंबियांना कोणत्या स्वरुपाची मदत करण्यात आली वा येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी मानखुर्द येथील महाराष्ट्र नगरातील झोपडपट्टीला लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील ३ जणांचा मृत्यू झाला असून, ११ जण जखमी झाले आहेत.

सदर दुर्घटनेत अंदाजे रु. १,४५,०००/- इतकी वित्तहानी झाली आहे.
(३) सदर दुर्घटना घडल्यानंतर अरुंद गल्ल्या व एकमजली घरांमुळे अग्निशमन दलाला आपले कार्य पार पाडतांना मोठी कसरत करावी लागली हे खरे नाही.
(४) सदर दुघर्टनेची महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून चौकशी करण्यात आली असून, सदर आग ही राहत्या घरामध्ये असलेल्या एल.पी.जी. सिलेंडरमधून वायु गळती होत असतांना, गॅस लायटरचा वापर केल्याने लागली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी मृतांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीमधून मदत देण्यासाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांचेमार्फत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**फरासखाना (पुणे) येथे नवजात बाळाची विक्री करणाऱ्या तीन महिलांना झालेली अटक**

**(२५) * ७३९१८ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फरासखाना (पुणे) येथे नवजात बाळाची सव्वा तीन लाखात विक्री करणारा समुह कार्यरत असल्याचे आढळून येताच पोलीसांनी या प्रकरणी कारवाई करुन तीन महिलांसह एका संस्था चालकाला अटक केल्याची घटना दिनांक ७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणातील आरोपी केशव देंडे हा सासवड येथे लहान मुलांसाठी निरंकार वसतिगृह चालवत असून मुलांच्या विक्रीसाठी ग्राहक शोधण्याचे व पैसे घेण्याचे काम करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिसांमार्फत संबंधित घटनेची व निरंकार वसतिगृहाची चौकशी करुन दोषींविरुध्द गुन्हा दाखल करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच आरोपीमार्फत आतापर्यंत किती मुलांची विक्री करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) फरासखाना (पुणे) येथे नवजात बाळाची विक्री करणारा समुह कार्यरत असल्याचे पोलीसांनी उघडकीस आणले असून तीन महिलांसह एका संस्थाचालकाला अटक केल्याची घटना दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी निदर्शनास आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुन निरंकार बालग्राम संस्था, जाधववाडी, सासवड, पुणे या संस्थेच्या संस्थाचालकासह इतर तीन महिला अशा चार आरोपींविरुद्ध फरासखाना पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४/२०१७ बाल न्याय अधिनियम सन २०१५ चे कलम ८१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामधील चारही आरोपीस अटक करण्यात आली असून गुन्हा तपासावर आहे. परंतु निरंकार बालग्राम संस्था, जाधववाडी, सासवड, पुणे या संस्थेच्या संस्थाचालकाने यापुर्वी मुलांची विक्री केल्याचे व अशा प्रकारचे गुन्हे केल्याचे तपासात आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**घोडबंदर रोड, ठाणे** येथे **टाटा कन्सनल्टन्सी सर्व्हिसेस कंपनीच्या इमारतीचे बांधकाम सुरु असताना ३ कामगारांचा झालेला मृत्यू**

**(२६) * ७४२४३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर रोड, पातलीपाडा (जि. ठाणे) येथील टाटा कन्सनल्टन्सी सर्व्हिसेस कंपनीच्या नव्याने बांधण्यात येत असलेल्या इमारतीचा पाया खोदण्याचे काम सुरू असताना दिनांक २३ डिसेंबर २०१६ रोजी मातीचा ढिगारा खड्डयात पडल्याने त्याखाली ७-८ कामगारांचा मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारतीच्या १ पायाचे खोदकाम सुरू असताना तेथे काम करणा-या कामगारांना सुरक्षेसंबंधी कोणतीही साधन सामुग्री पुरविण्यात आली

नव्हती तसेच आपातकालीन परिस्थितीत बचावासाठी कोणतीही योजना उपलब्ध नसणे तसेच सदर प्रकरणात अद्यापही कासार वडवली पोलीस ठाण्याच्या अधिका-यांनी विकासका विरोधात मनुष्य वधाचा गुन्हा दाखल केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार विकासकाविरूध्द गुन्हा दाखल करणेबाबत कोणती कारवाई केली तसेच मृत कामगारांच्या कुटुंबीयांना किती आर्थिक मदत देण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) अंशत: खरे आहे.

सुरक्षा केबीनच्या बांधकामाकरिता खोदण्यात आलेल्या खड्ड्यालगतच्या जमिनीचे स्खलन झाल्यामुळे घसरुन खड्ड्यात पडून मातीत गाडले गेल्याने ३ कामगारांचा मृत्यू झाला आहे.

(२) हे खरे नाही.

कामगारांना बांधकामाच्या ठिकाणी सुरक्षासंबंधी हेल्मेट, सेफ्टी शूज, सेफ्टी बेल्ट इत्यादी सुरक्षेची सामग्री पुरविण्यात आली होती आणि तेथे प्रोजेक्ट मॅनेजर आणि सेफ्टी ऑफिसरची नेमणूक केली आहे.

सदर अपघाताच्या ठिकाणी तातडीने आपत्कालीन व्यवस्थापन पथक, अग्निशामक दल व वैद्यकीय पथक उपस्थित झाले होते आणि त्यांनी बचाव कार्य त्वरीत सुरु केले.

प्रकरणी कासारवडवली पोलीस स्टेशन,ठाणे मार्फत मे.गायत्री कंस्ट्रक्शन कंपनी आणि मे. वैष्णवी एंटरप्रायझेस या कंपन्यांचे मालक व संबंधितांविरुध्द भारतीय दंड विधान संहितेच्या कलम ३०४(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) होय.

पोलीसांमार्फत कासारवडवली पोलीस स्टेशन, ठाणे मार्फत मे.गायत्री कंस्ट्रक्शन कंपनी आणि मे. वैष्णवी एंटरप्रायझेस या कंपन्यांचे मालक व संबंधितांविरुध्द भारतीय दंड विधान संहितेच्या कलम ३०४(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच,कामगार कार्यालयाने मे.गायत्री कन्स्ट्रक्शन या ठेकेदारांविरुद्ध

१) किमान वेतन अधिनियम

२) वेतन प्रदान अधिनियम

३) कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) या अधिनियमांतर्गत आणि मे.वैष्णवी एन्टरप्रायजेस या ठेकेदाराविरुद्ध

१) किमान वेतन अधिनियम,

२) वेतन प्रदान अधिनियमांतर्गत

मा.प्रथम वर्ग न्यायादंडाधिकारी,ठाणे यांच्या न्यायालयात खटले दाखल केले आहेत.

तसेच, विकासक आणि संबंधित दोन्ही ठेकेदारांविरुद्ध इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम, १९९६ च्या कलम ५० अंतर्गत मुख्य निरीक्षक यांच्या समोर खटले दाखल केले आहेत.

मृत कामगारांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई अधिनियमांतर्गत देय होणारी रक्कम रु.२४,१०,६००/- नुकसान भरपाई आयुक्त यांचेकडे डिमांड ड्राफ्ट क्र.८६१६०,दिनांक २८.१२.२०१६ रोजी जमा करण्यात आलेली आहे.तसेच अंत्यविधीकरिता तातडीने मदत म्हणून रक्कम रु.३,७०,०००/-मृत कामगारांच्या नातेवाईकांना देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बोरीवली (पश्चिम), मुंबई येथील हृषीकेश पार्क या इमारतीच्या विकासकाने एफएसआयमध्ये केलेला गैरव्यवहार**

**(२७) * ७४६९९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली पश्चिम (मुंबई) येथील विभागातील हृषीकेश पार्क या इमारतीच्या विकासकाने एफएसआयमध्ये गैरव्यवहार केल्याबाबत स्थानिक रहिवाशांनी तक्रार केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एफएसआय गैरव्यवहार हा अंदाजे २३२ कोटी रुपयांचा असल्याचा स्थानिकांची तक्रार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक रहिवाशांनी वारंवार महापालिकेकडे तक्रार करूनही अधिकाऱ्यांनी दखल न घेतल्याने पी.एम.ओ. कडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर एफएसआय गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे

काय, चौकशीनुसार विकासकावर व संबंधितदोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बोरीवली (पश्चिम) येथील हृषीकेश पार्क या इमारतीच्या विकासकाने एफ. एस. आय. मध्ये गैरव्यवहार केल्याबाबत स्थानिक रहिवाशांनी तक्रारी केल्या होत्या हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारींमध्ये गैरव्यवहाराच्या रकमेबाबतचा उल्लेख नाही.

(३) सदर प्रकरणी स्थानिक रहिवाशांनी महानगरपालिकेकडे केलेल्या तक्रारींना वेळोवेळी उत्तरे देण्यात आली आहेत.

तसेच, स्थानिक रहिवाशांनी पी.एम.ओ. कडे दिनांक २९.०७.२०१६ रोजी केलेल्या तक्रारीसंदर्भात महानगरपालिकेमार्फत दिनांक ०८.१२.२०१६ रोजी उत्तर देण्यात आले आहे.

(४) सदर भूखंडावरील टी. डी. आर. वापरण्यासाठी अभिन्यासातील नोंदणीकृत निवासी सहकारी सोसायटयांची संमती नसल्यामुळे विकासकाने बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी केलेली विनंती अमान्य करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी विकासकास विहित कालावधीत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्याने त्यास दिनांक १३.०८.२०१३ रोजी दिलेल्या आय. ओ. डी. ची विधीग्राह्यता व्यपगत झाली आहे.

सद्य:स्थितीत सदर भूखंडावर कोणतेही बांधकाम अस्तित्वात नाही.

सदर प्रकरणी महानगरपालिकेने बांधकामास परवानगी दिलेली नसल्याने एफ. एस. आय. मध्ये गैरव्यवहार झाला हे खरे नाही. त्यामुळे सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**श्री महालक्ष्मी देवस्थान, शाहूवाडी (जि.कोल्हापूर) येथील जमिनीचा करण्यात आलेला गैरव्यवहार**

**(२८) * ७७०३७ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या अंतर्गत येणाऱ्या श्री महालक्ष्मी

देवस्थान, शाहूवाडी (जि.कोल्हापूर) येथील एक हजार एकर जमीन बळकावण्याचा प्रयत्न मुंबई आणि अन्य ठिकाणच्या काही कंपन्यांकडून झाल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये निदर्शनास आले असून उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहारात पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या काही पदाधिकाऱ्यांचा समावेश असून बनावट सह्या तसेच लेटरहेडचा वापर करुन गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी होऊ नये याकरिता तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक, श्री.अमित मस्के यांची बदली करून तपास यंत्रणेवर दबाव आणला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर गुन्हा दाखल करुन कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मौजे उदगिरी, ता.शाहूवाडी येथील जमीन गट क्र.७३,३७,३८,३९,४०,४१,४२,६५,६७, २७०,२७२, २७५,२७६,२९०,१९१,१९२,१९५,१९६ या देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांच्या मालकीच्या, श्री काळम्मा देवी देवस्थान जमिनीमध्ये आयुर्वेदिक प्लान्टेंशन, सोलर उर्जा प्रकल्प उभारण्यासाठी मे.एन.एस. कुंभार ट्रेडर्स ॲन्ड मिनरल्स, पेठ वडगांव, ता. हातकणंगले व ए.सी.ई.रिसोर्सेस इंडिया, ३०३ गुंदेशा गार्डन्स, दत्तात्रय खामकर लालबाग मुंबई या दोन कंपन्यांनी तहसिलदार,ता.शाहूवाडी यांना देवस्थान समितीचे आदेश खरे असल्याचे भासवून, सदर जमिनी या कंपन्यांनी आपल्या नावावर नोंद करून घेण्यासाठी खोटे आदेश बनविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत दिनांक.०५.०५.२०१६ रोजी जुना राजवाडा पोलीस स्टेशन,कोल्हापूर येथे क्रमांक ९७/१६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या संदर्भात लोकप्रतिनिधींचे निवेदन शासनास प्राप्त झाले असून गृह विभागाच्या माध्यमातून कार्यवाही चालू आहे.

(२) देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या कार्यालयाचे लेटरहेड व शिक्के यांचा गैरवापर केल्याबाबत अज्ञात व्यक्ती विरुध्द जुना राजवाडा पोलीस स्टेशन येथे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात

आला आहे. सदर प्रकरणी देवस्थान व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे किंवा कसे हे अद्यापी पोलीस तपासामध्ये निष्पन्न झालेले नाही. परंतु प्रस्तुत प्रकरणी अज्ञात व्यक्तिने कार्यालयातील लेटरहेड, शिक्के, जावक रजिस्टर यांचा गैरवापर करुन सचिव तथा उप जिल्हाधिकारी, देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र यांच्या बोगस सह्या केल्याचे पोलीस तपासामध्ये निष्पन्न झाले आहे.

(३) हे खरे नाही.पोलीस उपनिरिक्षक श्री.अमित मस्के यांचा जुना राजवाडा पोलीस ठाणे कडील कार्यकाळ पूर्ण झाल्याने प्रशासकीय कारणास्तव त्यांची बदली बी.डी. डी. एस. युनिट, कोल्हापूर येथे करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास यंत्रणेवर कोणताही दबाव नसून गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक, जुना राजवाडा पोलीस ठाणे व उप विभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग, कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक श्री.डी.ए.मोरे करीत आहेत.

(४) सदर प्रकरणी जुना राजवाडा पोलीस ठाणे भाग-५, गु.र.नं. ९७/२०१६, भा.दं.वि.स. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ प्रमाणे दि.०५.०५.२०१६ रोजी १३:१७ वाजता अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही. सदर प्रकरणी वरीलप्रमाणे गुन्हा दाखल असून गुन्हयाच्या तपासादरम्यान अज्ञात आरोपी निष्पन्न करण्यासाठी सर्व वादग्रस्त दस्तऐवज, रजिस्टर व शिक्के गुन्हयाच्या तपासकामी जप्त करुन हस्ताक्षर तज्ञांचा अभिप्राय मिळण्याकरीता प्रस्ताव मुख्य शासकीय दस्तऐवज परिक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा., पुणे यांना सादर करण्यात आला आहे.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.